

# धूप आरती

(सायंकाली ६ ।। अगर ७ बाजना दिनमानाप्रमाणे)

## १ – साईबाबा (आरती)

आरती साईबाबा सौख्यदातार जीवा। चरणरजातलीं। घावा दासां विसांवा, भक्तांविसांवा॥ आरती साईबाबा॥

जाळुनियां अनंग। स्वस्वरूपीं राहे दंग। मुमुक्षुजनां दावी। निज डोळां श्रीरंग, डोळां श्रीरंग। आरती साईबाबा॥१॥

जया मनीं जैसा भाव। तया तैसा अनुभव। दाविसी दयाधना। ऐसी तुझी ही भाव, तुझी ही भाव। आरती साईबाबा॥२॥

तुमचें नाम ध्यातां। हरे संसृतिव्यथा। अगाध तव करणीमार्ग दाविसी अनाथा, दाविसी अनाथा। आरती साईबाबा॥३॥

कलयुगीं अवतार। सगुणब्रह्म साचार। अवतीर्ण झालासे। स्वामी दत्त दिगंबर, दत्त दिगंबर। आरती साईबाबा॥४॥

आठां दिवसां गुरुवारीं। भक्त करिती वारी। प्रभुपद पहावया। भवभय निवारी, भय निवारी। आरती साईबाबा॥५॥

माझा निजद्रव्यठेवा। तव चरणरज सेवा। मागणें हेंचि आता। तुम्हा देवाधिदेवा, देवाधिदेवा। आरती साईबाबा॥६॥

इच्छित दीन चातक। निर्मल तोय निज सुख। पाजावें माधवा या। सांभाळ निज आपुली भाक, आपुली भाक। आरती साईबाबा॥७॥

आरती साईबाबा सौख्यदातार जीवा। चरणरजातलीं। घावा दासां विसांवा, भक्तां विसांवा॥ आरती साईबाबा॥

## २ – शिरडी माझे पंढरपुर (अभंग)

शिरडी माझें पंढरपुर। साईबाबा रमावर। साई रमावर, साईबाबा रमावर॥

शुद्ध भक्ति चंद्रभागा। भाव पुंडलीक जागा। पुंडलीक जागा, भाव पुंडलीक जागा॥

या हो या हो अवघे जन। करा बाबांसी वंदन। बाबांसी वंदन, करा बाबांसी वंदन॥

गणू म्हणे बाबा साई। धांव पाव माझे आई। पाव माझे आई, धांव पाव माझे आई॥

## ३ – घालीन लोटांगण (नमन)

घालीन लोटांगण, वंदीन चरण
डोळयांनीं पाहीन रुप तुझें॥
प्रेमें आलिंगन, आनंदें पूजिन
भावें ओंवाळिन म्हणेनामा ॥१॥

त्वमेव माता च पिता त्वमेव
त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव।
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव
त्वमेव सर्वं मम देवदेव ॥२॥

कायेनवाचा मनसेंद्रियैर्वा
बुद्धयात्मना वा प्रकृतिस्वभावात।
करोमि यद्यत्सकलं परस्मै
नारायणायेति समर्पयामि ॥३॥

अच्युतं केशवं रामनारायणं
कृष्णदामोदरं वासुदेवं हरिम्।
श्रीधरं माधवं गोपिकावल्लभं
जानकीनायकं रामचंद्रं भजे ॥४॥

## ४ – नामस्मरण

हरे राम हरे राम राम राम हरे हरे। हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे॥ (इति त्रिवार)

## ५ – नमस्काराष्टक

अनंता तुला तें कसें रे स्तवावें। अनंता तुला तें कसें रे नमावें। अनंता मुखांचा शिणे शेष गातां। नमस्कार साष्टांग श्री साईनाथा॥१॥

स्मरावें मनीं त्वत्पदां नित्य भावें। उरावें तरी भक्तिसाठीं स्वभावें। तरावें जगा तारुनी मायताता। नमस्कार साष्टांग श्रीसाईनाथा ॥२॥

वसे जो सदा दावया संतलीला। दिसे अज्ञ लोकांपरी जो जनांला। परी अंतरीं ज्ञान कैवल्यदाता। नमस्कार साष्टांग श्रीसाईनाथा ॥३॥

न दत्तगुरु साई मा, मजवरी कधीही रुसो ।।४ ।।
रुसो कवि ऋषी मुनी अनघ सिद्ध योगी रुसो ।
रुसो हि गृहदेवता, नि कुलग्रामदेवी रुसो ।।
रुसो खल पिशाच्चही, मलिन डाकिनीही रुसो ।
न दत्तगुरु साई मा मजवरी कधीही रुसो ।।५ ।।
रुसो मृग खग कृमी, अखिल जीवजंतू रुसो ।
रुसो विटप प्रस्तरा अचल आपगाब्धी रुसो ।
रुसो ख पवनाग्नि वार अवनि पंचतत्त्वे रुसो ।
न दत्तगुरु साई मा, मजवरी कधीही रुसो ।।६ ।।
रुसो विमल किन्नरा अमल यक्षिणीही रुसो ।
रुसो शशि खगादिही गगनि तारकाही रुसो ।।
रुसो अमरराजही अदय धर्मराजा रुसो ।
न दत्तगुरु साई मा, मजवरी कधीही रुसो ।।७ ।।
रुसो मन सरस्वती, चपलचित्त तेही रुसो ।
रुसो वपु दिशाखिला कठिण काल तोही रुसो ।।
रुसो सकल विश्वही मयि तु ब्रह्मगोल रुसो ।
न दत्तगुरु साई मा, मजवरी कधीही रुसो ।।८ ।।
विमूढ म्हणूनी हसो, मज न मत्सराही डसो ।।
पदाभिरुचि उल्हसो, जननकर्दमी ना फसो ।
न दुर्ग धृतिचा धसो, अशिवभाव मागे खसो ।
प्रपंचि मन हे रुसो, दृढ विरक्ति चित्ती ठसो ।।९ ।।
कुणाचिहि घृणा नसो, न च स्पृहा कशाची असो ।
सदैव हृदयी वसो, मनसि ध्यानि साई वसो ।।
पदी प्रणय वोरसो, निखिल दृश्य बाबा दिसो ।
न दत्तगुरु साई मा, उपरि याचनेला रुसो ।।१० ।।

## ९ – पुष्पांजली

ॐ यज्ञेन यज्ञमयजंत देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन्। ते ह नाकं महिमानः सचंत यत्र पूर्वे साध्या संति देवाः॥

ॐ राजाधिराजाय प्रसह्यसाहिने नमो वयं वैश्रवणाय कुर्महे। स मे कामान्कामकामाय मह्यं कामेश्वरो वैश्रवणो ददातु। कुबेराय वैश्रवणाय महाराजाय नमः। ॐ स्वस्ति।

साम्राज्यं भौज्यं स्वाराज्यं वैराज्यं पारमेष्ठ्यं राज्यं माहाराज्यमाधिपत्यमयं समंतपर्यायी स्यात्सार्वभौमः सार्वायुष आंतादापरार्धात् पृथिव्यै समुद्रपर्यंताया एकराळिति। तदप्येष श्लोकोऽभिगीतो मरुतः परिवेष्टारो मरुत्तस्यावसन्गृहे। आविक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवाः सभासद इति॥

## (१०) प्रार्थना

करचरणकृतं वाक्कायजं कर्मजं वा
श्रवणनयनजं वा मानसं वाऽपराधम्।
विदितमविदितं वा सर्वमेतत्क्षमस्व
जय जय करुणाब्धे श्री प्रभो साईनाथ ।।१ ।।

श्री सच्चिदानंद सद्गुरू साईनाथ महाराज की जय
ॐ राजाधिराज योगीराज परब्रह्म साईनाथ महाराज
श्री सच्चिदानंद सद्गुरू साईनाथ महाराज की जय